सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, कराड

विद्यानगर, कराड ता. कराड जि. सातारा ४१५ १२४.

फोन नंबर (02164) 271 462 ई-मेल - gpkarad.dte@gmail.com

जा.क्र.शातंक/विवि/२०२५-२०२६/नियमित/शिष्यवृत्ती/रिअप्लाय-प्रलंबित अर्ज/ 258 दिनांक – 23 JAN 2026

अत्यंत महत्वाचे सूचना--- दि २८/०१/२०२६ पर्यंत.

विषय – शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मधील महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती योजना करीता अर्ज भरणे बाबत व Sent Back केलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्जातील त्रुटींची पूर्तता करुन शिष्यवृत्ती अर्ज त्वरीत Re-apply करणे बाबत..

१)राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवत्ती योजना.

२) डॅा. पंजाबराव देशमूख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना .

३) उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना..

संदर्भ - १) या कार्यालयाचे महत्वाची सूचना पत्र क्र जा.क्र.शातंक/विवि/शिष्यवृत्ती/२०२५-२०२६/२१११. दि १५/१०/२०२५.

२) या कार्यालयाचे महत्वाची सूचना पत्र क्र जा.क्र.शातंक/विवि/२०२५-२०२६/नियमित/शिष्यवृत्ती/रिअप्लाय/ २४१६. दि १५/११/२०२५.

३) या कार्यालयाचे महत्वाची सूचना पत्र क्र जा.क्र.शातंक/विवि/२०२५-२०२६/नियमित/शिष्यवृत्ती/रिअप्लाय/ २७३९. दि ११/१२/२०२५.

४)मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पूणे -१६ यांच पत्र क्र जा.क्र.तंशिविकापू/विवि-४/महाडीबीटी-प्रलंबित अर्ज /२०२६/२५४. दि २१ /१/२०२६.

वरील संदर्भ क्रं १ ते ३ चे पत्रानुसार कळविलेप्रमाणे या संस्थेतील शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करीता प्रवेश घेतलेल्या प्रथम , व्दितीय व तृतिय वर्षातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना वरील शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने www.mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करणे बाबत तसेच अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर दररोज आपल्या अर्जाची स्थिती तपासावी व अर्जामध्ये काही त्रुटी असल्यास ती दुर करुन अर्ज पुनश्चः त्वरीत ऑनलाईन सादर करणे बाबत व अर्ज जो पर्यंत मंजूर होत नाही तोपर्यंत आपल्या अर्जाची स्थिती विद्यार्थ्यांनी आपले लॅागीनमध्ये ऑनलाईन पध्दतीने वेळोवेळी (दररोज) तपासणे आवश्यक आहे असे कळविण्यात आले होते.

तरी संदर्भ क्रं ४ चे पत्रान्वये कळविलेप्रमाणे सन २०२५-२०२६ करीता सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे १) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना. २) डॅा. पंजाबराव देशमूख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना . ३) उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना व इतर शिष्यवृत्ती अर्ज त्वरीत ऑनलाईन पध्दतीने महाडीबीटी या संकेतस्थळावर भरावेत. तसेच सदरचे ऑनलाईन भरलेले अर्जातील त्रुटीमूळे त्यांच्या लॅागीनमध्ये Sent Back या अंतर्गत शिष्यवृत्ती योजनांचे व इतर शिष्यवृत्तीचे अर्ज परत त्यांच्या लॅागीनमध्ये आले असतील तर सदरचे शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज व इतर शिष्यवृत्तीचे अर्ज त्वरीत दिनांक २८/०१/२०२६ पर्यंत Re-apply करणेत यावे याची नोंद घ्यावी.

जे विद्यार्थी शिष्यवृत्तीचे अर्ज वेळेत दि २८/०१/२०२६ पर्यंत भरणार नाहीत अथवा Sent Back केलेले अर्ज Re-apply करणार नाहीत, त्यांचे अर्ज त्यांचे लॅागीनमध्ये प्रलंबित राहिल्यास अथवा त्रुटींची पूर्तता न केल्यास त्यांना शिक्षण शुल्क व इतर शुल्क मिळणार नाही व सदर विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व इतर शुल्क रक्कम भरावी लागेल याची नोंद घ्यावी.

तसेच शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करीता ज्या विद्यार्थ्यांनी एन एस पी शिष्यवृत्ती मिळणेकरीता ऑनलाईन अर्ज केलेले आहेत व त्यांनी इतर शिष्यवृत्ती मिळणेकरीता अर्ज केला असल्यास त्यांनी त्वरीत विद्यार्थी विभागाशी संपर्क साधावा.

(डॅा. सुरेश आ. पाटील)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, कराड.

प्रत- मुख्य सूचना फलकावर सर्व संबंधित विद्यार्थ्यांना माहितीसाठी व पूढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

सोबत- प्रथम, व्दितीय व तृतिय वर्ष Sent Back केलेली विद्यार्थ्यांची यादी.

प्रत- डॅा.एस.व्ही.खवळे, अधि.भौतिकशास्त्र , यांना विभाग नियंत्रक विज्ञान विभाग, शा.तं.कराड यांचे मार्फत माहितीसाठी.

प्रत- संगणक विभाग- शा.तं.कराड यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

प्रत- सर्व विभाग प्रमुख यांना कळविण्यात येते की, त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना माहितीसाठी कळवावे.